## निशाणी क्र.६३ वरील आदेश
## (दि.१४.०८.२०२४ रोजी पारीत)

. प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी त्यांच्या विरुध्द् दि.०४.०८.२०२३, ११.०३.२०२४ व ०७.०५.२०२४ रोजी पारीत झालेले विना उलटतपास आदेश रद्य करुन साक्षीदारांचा उलटतपास घेण्यास परवानगी मिळण्यासाठी प्रस्तुत अर्ज केला आहे.

२. त्यांचे नुसार प्रतिवादी हे फौजदारी प्रकरणात व्यस्त असल्याने नेमलेल्या तारखेवर साक्षीदारांचा उलटतपास घेऊ शकले नाही. त्यामुळे त्यांच्या विरुध्द् विना उलटतपास प्रकरण पुढे चालविण्याबाबत आदेश पारीत करण्यात आला. मात्र,यापुढे सर्व साक्षीदारांचा उलटतपास घेण्यास प्रतिवादी तयार आहेत. याउलट,वादी यांचे नुसार प्रतिवादींना उलटतपास घेण्यासाठी संधी मिळूनही त्यांनी दाव्यात हजर राहून वादीच्या साक्षीदारांचा उलटतपास घेतला नाही. त्यामुळे अर्ज खर्चासह खारिज होण्यास वादींनी विनंती केली.

३. दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकले आणि अभिलेखावरील दस्तऐवजांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की,वादी यांचे वतीने वेळोवेळी तीन साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली,परंतु प्रतिवादी यांचे वतीने कोणीही हजर न झाल्याने त्यांचे विरुध्द् उलटतपास नाही असे आदेश पारीत करण्यात आले. त्यानंतर प्रकरण प्रतिवादींच्या पुराव्यासाठी ठेवण्यात आले. परंतु दि.

२६.०७.२०२४ रोजी प्रतिवादींनी प्रस्तुत अर्ज दाखल करुन वादीच्या साक्षीदारांचा उलटतपास घेण्यास व प्रकरण पुढे चालविण्यास तयारी दर्शविली.

४. मुळात वादी यांनी प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचे विरुध्द् मनाई हुकूमाची मागणी केलेली आहे. तसेच,प्रतिवादी क्र.३ यांनी दि.०८.०२.२०१७ रोजी पारीत केलेले आदेश बेकायदेशीर असून वादींवर बंधनकारक नसल्याचे घोषीत करण्यास सुध्दा विनंती केलेली आहे. त्यामुळे प्राप्त परिस्थितीत,प्रतिवादी क्र.१ ते ४ यांना वादी व त्यांच्या साक्षीदारांचा उलटतपास घेण्यास संधी दिल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट दोन्ही पक्षांना दावा गुणदोषावर निकाली काढण्यास मदत होईल. करीता प्रतिवादी क्र.१ ते ४ यांचा अर्ज मंजूर होण्यास पात्र ठरतो. त्या अनुषंगाने पुढीलप्रमाणे आदेश करण्यात येतो.

## आदेश

१ प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी दाखल केलेला नि.क्र.६३ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२ प्रतिवादी यांनी वादी व त्यांच्या साक्षीदारांचा उलटतपास पुढील तारखेस न चूकता घ्यावा.

३ येणेप्रमाणे अर्ज निकाली काढण्यात येत आहे.

DISTRICT COURTS MAHARASHTRA
सत्यमेव जयते

Digitally signed by MADHURI RAMNARAYANSINHA KHANWE
Date: 2024.08.14 16:31:34 +0530

(श्रीमती माधुरी रा.खनवे)

दि.१४.०८.२०२४

२रे सह दिवाणी न्यायाधीश(व.स्तर)
जालना

**प्रमाणपत्र**

खालीलप्रमाणे निवेदन करण्यात येते की,सदर पी.डी.एफ. संचिकेच्या मजकुरातील शब्द न् शब्द मुळ आदेशाप्रमाणे आहे.

लघुलेखकाचे नाव :–देशमुख शिरीष दि.

न्यायालयाचे नाव :–२रे सह दिवाणी न्यायाधीश(व.स्तर),जालना.

पी.डी.एफ.दिनांक :–१४.०८.२०२४

लघुलेखक(म.)